# विविध आजारांबाबतची प्राथमिक लक्षणे व उपाय योजना

## चिकण गुनिया बाबतची प्राथमिक लक्षणे व उपाय योजना

| अ. क्र. | आजाराचे नाव | कारणे | चिन्हे आणि लक्षणे | उपाय योजना | प्रतिबंधक उपाय |
|---|---|---|---|---|---|
| १ | चिकण गुणिया (विषाणुंमुळे होणारा हा आजार आहे.) | दुषित डास चावल्यामुळे | अचानक ताप येणे | ताप उतरविण्याचे औषध घेणे. | लस उपलब्ध नाहीत |
| | | | लस ग्रंथीचा आकार वाढलेला असतो. | रोग्यास स्वतंत्र ठेवावे. | घरामध्ये जास्त दिवस पाणी ठेवु नये. |
| | | | लाल व तपकेरी रंगाचे त्वचेवर दिसणारे ठिपके | द्रव पदार्थ भरपुर खाण्यास द्यावे. | घरातील पाणी साठविण्यसाठी भांडी,रांजण, हौद आठवडयातुन एका दिवशी स्वच्छ धुवुन ठेवावीत. |
| | | | त्वचेवर उठणाऱ्या लहान लहान फुटकुळया. | त्वचेची काळजी घ्यावी. | झोपताना मच्छरदानी डास पळविणारे लिक्विड, धुप, आगरबत्ती, क्रिमचा वापर करावा. |
| | | | पापण्या व डोळयावरील म्युकस मेंम्ब्रेन च्या आवरणाला संसर्ग होणे. | डॉक्टरांच्या आदेशांप्रमाणे ॲंटीबायोटीक्स व सांधेदुखी वर वेदनाशामक औषधोपचार घ्यावे. | कायमस्वरुपी पाणी साठविलेल्या डासोत्पत्ती स्थानकात डास अंडी भक्षक गप्पी मासे सोडावेत. |
| | | | ६.काही वेळेस रक्तश्रावाची चिन्हे लक्षणे दिसतात. | | |

# मलेरिया बाबतची प्राथमिक लक्षणे व उपाय योजना

| अ. क्र. | आजाराचे नाव | कारणे | चिन्हे आणि लक्षणे | उपाय योजना | प्रतिबंधक उपाय |
|---|---|---|---|---|---|
| ३ | मलेरिया | ॲनाफिलिस डासांच्या मादीपासुन प्रसार होतो. | प्रथम दातांवर दात आपटतात सर्व अंग थरथरते, कितीही पांघरुणे घेतले तरी थंडी आवरत नाही. | रोग्यास संपुर्ण विश्रांती द्यावी, थंडी वाजते त्यावेळेस गरम कपडे घालावेत, दारे खिडक्या बंद करावीत. | डासांचा नायनाट करुन<br>मच्छरदानीचा वापर करुन |
| | | | ताप येतो जवळ जवळ १०२ ते १०३ फॅ.पर्यंत चढतो. रोगी अंगावरचे गरम कपडे बाजुस सारतो. | तापाच्या वेळेस गरम पांघरणे, रोगनिदान गरम कपडे काढुन पातळ, सुती कपडे घालावेत,गार पेय पिण्यास द्यावे. | सार्वजनिक स्वच्छता ठेवुन रोगाचा प्रतिबंध करता येतो |
| | | | भरपुर घाम येऊन ताप उतरतो, त्यानंतर रोग्यास थकवा येतो व झोपुन जातो. | घामाचे ओले कपडे काढुन घाम पुसावा, कोरडे सुती कपडे घालावेत, उत्तेजक पेय द्यावे व आरामशिर झोपावावे | केसेस शोधुन काढुन त्यांना योग्य उपचार द्यावे. |

# डेंग्यु रोगाबाबतची प्राथमिक लक्षणे व उपाय योजना

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>आजाराचे नाव</th><th>कारणे</th><th>चिन्हे आणि लक्षणे</th><th>उपाय योजना</th><th>प्रतिबंधक उपाय</th></tr>
<tr><td rowspan="6">४</td><td rowspan="6">कारणीभुत जंतु (डेंग्यु व्हायरस) डेंग्यु फिवरलाच ब्रेक बोन फिवर असेही म्हणतात</td><td rowspan="2">दुषित डास चावल्यामुळे</td><td>एकाकी तिव्र ताप येणे</td><td>तीव्र तापाच्या आवस्थेत रुग्णाने बिछान्यावर पडुन विश्रांती घेणे.</td><td>घरामध्ये जास्त दिवस पाणी साठवुन ठेवु नये</td></tr>
<tr><td>तीर्व डोके दुखी, सांधे दुखी, स्नायु दुखी.</td><td rowspan="3">शरीराचे तापमान ४० च्या कमी ठेवण्यासाठी ओल्या कपडयाने अंग पुसने व ताप कमी करण्यासाठी गोळया देणे.</td><td>पाणी साठे दुहेरी कपडयाने झाकुन ठेवावे जेणे करुन डास पाण्यावर बसुन अंडी घालणार नाहीत.</td></tr>
<tr><td rowspan="4">एडीस इजिप्ती व एडिस अलबोपिक्टस या डासांचे वाढलेले प्रमाण आणि पर्यावरणात असलेले डेंग्यु वितरण</td><td>उलटया होणे, अंगावर लालसर पुरळ येणे.</td><td rowspan="2">कायमस्वरुपी पाणी साठविलेल्या डासोत्पत्ती ठिकाणी डास अंडी भक्षक मासे सोडावेत.</td></tr>
<tr><td>रक्तश्रावयुक्त डेंग्युमुळे त्वचेखाली रक्तश्राव होणे.</td></tr>
<tr><td>रक्ताची उलटी होणे</td><td rowspan="2">तोंडावाटे द्रव पदार्थ व क्षार देणे.</td><td>नाल्या साचलेली पाण्याची डबकी वाहत्या कराव्यात अथवा डबकी भरुन टाकुन बंद कराव्यात.</td></tr>
<tr><td>काळसर व रक्त मिश्रीत संडास होणे, मृत्यु संभवणे.</td><td>ताप आल्यास नजीकच्या शासकीय दवाखाना/ प्राथमिक आरोग्य केंद्र / उपकेंद्र /ग्रामीण रुग्णालयात जावुन तपासणी करुन रक्त नमुना देऊन उपचार घ्यावा.</td></tr>
</table>

# गॅस्ट्रो रोगाबाबतची प्राथमिक लक्षणे व उपाय योजना

| अ. क्र. | आजाराचे नाव | कारणे | चिन्हे आणि लक्षणे | उपाय योजना | प्रतिबंधक उपाय |
|---|---|---|---|---|---|
| ५ | गॅस्ट्रो एंटेराटीस (कारणीभुत जंतु कॉलीफॉर्म बॅसिलॉय | रोग्याच्या मलापासुन संसर्ग पसरतो | एक सारख्या उलटया होणे. | बिछान्यात झोपवुन ठेवावे. | लस उपलब्ध नाही. |
| | | | भरपुर व पातळ पाण्यासारखे अतिसार होतात. | स्वतंत्र ठेवावे. | माहित असलेल्या रुग्णापासुन दुर रहावे. |
| | | दुषित अन्न पाणी, दुध पिल्याने | शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे जलकमतरता होणे | मलाचे जंतुरहितीकरण करुन मगच विल्हेवाट लावावी. | वैयक्तीक स्वच्छता ठेवणे. |
| | | | निस्तेजपणा वाढत जाणे. | मऊ भातवरण, चहा, कॉफी, सरबत, फळांचा रस द्यावा. | वातावरणाची स्वच्छता ठेवणे. |
| | | इतर कॅरिअर्स | डोळे खोल जातात, टाळु खोल जाते, त्वचा सुरकुतते | डॉक्टरी आदेशानुसार औषधे द्यावीत. | अन्न हताळणाऱ्यांची ठराविक अंतराने तपासणी करणे. |
| | | | मुल अगदी गर्भगळीत होऊन टॉक्सीक दिसु लागते, तापही असतो. | घरगुती उपाय जलसंजीवनी करुन द्यावी. | |